16 JUL 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोणंद मुक्कामी विसावला वैष्णवांचा मेळा

## संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सातारा जिल्ह्यात उत्साहात स्वागत

**लोणंद : ज्ञानेश्वर ससाणे**

लाखो वैष्णवांसह विठ्ठल भेटीसाठी निघालेल्या माऊलींच्या पालखीचे बुधवारी दुपारी सातारा जिल्ह्यात उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी माऊलींच्या गजराने वातावरणात आनंद निर्माण झाला होता.



माऊलींच्या पालखी सोहळ्याचे सातारा जिल्ह्याच्या सीमेवर पाडेगाव, ता. खंडाळा येथे दुपारी दोन वाजता पालकमंत्री शंभूराज देसाई, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले, मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील, खासदार नितीन पाटील, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उत्साहात स्वागत केले. यावेळी माऊलींच्या स्वागतासाठी जिल्ह्याच्या सीमेवर जमलेल्या हजारो भाविकांनी 'माऊली... माऊली'चा गजर करत पालखी सोहळ्यावर पुष्पवृष्टी केली. यावेळी सातारा जिल्हा पोलीस दलाच्या बँड पथकाने माऊलींना सलामी दिली. बुधवारी सकाळी ६.३० वाजता वाल्मिक ऋषींची भूमी असणाऱ्या वाल्हे, जि. पुणे येथून संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सातारा जिल्ह्याकडे मार्गस्थ झाला. माऊलींचा पालखी सोहळा सकाळी ११ वाजता नीरा नदीकाठी नीरा, ता. पुरंदर येथे भोजन व विश्रांतीसाठी थांबला. यावेळी नीरा घाटावर (पाडेगाव, ता. खंडाळा) येथे पालखी सोहळ्यातील लाखो वारकऱ्यांनी नीरा स्नानाचा मनसोक्त आनंद घेतला. त्यानंतर पालखीचे सातारा जिल्ह्यात आगमन झाले.



### शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात माऊलींचे स्वागत

संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचा सातारा जिल्ह्यात प्रवेश झाला. यावेळी माऊलींच्या स्वागतासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होते. ते वारीमध्ये सहभागी झाले. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सेवाभावी कार्यासाठी सहभागी झालेले आहेत.

16 JUL 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609

# शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात माऊलींचे स्वागत...

सातारा (महान्यूज अँड व्ह्यूज) :

संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचा आज पुणे जिल्ह्यातून सातारा जिल्ह्यात प्रवेश झाला. यावेळी माऊलींच्या स्वागतासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होते. पालखीच्या स्वागतानंतर दोघेही वारीमध्ये सहभागी झाले. वारीमध्ये दरवर्षीप्रमाणे शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आरोग्य, स्वच्छता, वृक्षारोपण, वारकरी सेवा इत्यादी सेवाभावी कार्यासाठी सहभागी झालेले आहेत.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2026
जनप्रवास



# शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात माऊलींचे स्वागत

**कोल्हापूर : संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचा बुधवारी पुणे जिल्ह्यातून सातारा जिल्ह्यात प्रवेश झाला. यावेळी माऊलींच्या स्वागतासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होते. पालखीच्या स्वागतानंतर दोघेही वारीमध्ये सहभागी झाले. वारीमध्ये दरवर्षीप्रमाणे शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आरोग्य, स्वच्छता, वृक्षारोपण, वारकरी सेवा इत्यादी सेवाभावी कार्यासाठी सहभागी झालेले आहेत.**

16 JUL 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
वाजी विद्यापीठ, कोल्हापु

# शिवाजी विद्यापीठाचा इन्फ्राप्लान समुहासमवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

जलसंपदाविषयक पायाभूत अभियांत्रिकी सुविधा क्षेत्रात अग्रेसर असलेल्या इन्फ्राप्लान समुहासमवेत शिवाजी विद्यापीठाने नुकताच सामंजस्य करार केला. संशोधन, कौशल्य विकास व उद्योग-शैक्षणिक सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देश करारामागे असून आधुनिक संशोधनाच्या दृष्टीने दोन्ही संस्थांमध्ये ज्ञान, तंत्रज्ञान व अनुभवांचे आदानप्रदान होऊन विद्यार्थी, संशोधक आणि उद्योग क्षेत्रासाठी नव्या संधी उपलब्ध होतील.



इन्फ्राप्लान समूह गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ जलसंपदा व पायाभूत सुविधा क्षेत्रात विशेष अभियांत्रिकी सेवा प्रदान करत आहे. समूहामध्ये इन्फ्राप्लान इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि., सिग्मा इन्फ्राप्लान इंजिनिअरिंग प्रा. लि. तसेच इन्फ्राप्लान हायड्रॉलिक लॅबोरेटरी यांचा समावेश आहे. विद्यापीठातील भूगोल अधिविभाग आणि हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्रामध्ये जलविद्याविषयक संशोधन सुरू असून या संशोधनाला उद्योग क्षेत्राची जोड मिळण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वाचा ठरणार आहे.

या सामंजस्य कराराअंतर्गत विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, औद्योगिक प्रशिक्षण, लाईव्ह इंडस्ट्री प्रोजेक्ट्स, संयुक्त संशोधन, कौशल्य विकास, नवोपक्रम, स्टार्टअप्स, पेटंट विकास तसेच विविध सरकारी संशोधन प्रकल्पांमध्ये सहकार्याची संधी मिळणार आहे. उद्योगाभिमुख शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना देणारा हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार असल्याचे यावेळी भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी सांगितले.

सामंजस्य करारावर कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि इन्फ्राप्लान समुहाचे संचालक आशिष अभय दोशी यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. गणेश न्हिवेकर आणि डॉ. सोमनाथ पवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
16 JUL 2026
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हाप



कोल्हापूर : सामंजस्य कराराच्या प्रतींचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत हस्तांतरण करताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि आशिष दोशी आदी.

# विद्यापीठ-इन्फ्राप्लानचा सामंजस्य करार

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

जलसंपदाविषयी पायाभूत अभियांत्रिकी सुविधा क्षेत्रात अग्रेसर असलेल्या इन्फ्राप्लान समूहासमवेत शिवाजी विद्यापीठाने नुकताच सामंजस्य करार केला. संशोधन, कौशल्य विकास व उद्योग-शैक्षणिक सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देश करारामागे असून आधुनिक संशोधनाच्या दृष्टीने दोन्ही संस्थांमध्ये ज्ञान, तंत्रज्ञान व अनुभवांचे आदानप्रदान होऊन विद्यार्थी, संशोधक आणि उद्योग क्षेत्रासाठी नव्या संधी उपलब्ध होतील, असे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी सांगितले.

इन्फ्राप्लान समूह गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ जलसंपदा व पायाभूत सुविधा क्षेत्रात विशेष अभियांत्रिकी सेवा प्रदान करत आहे. समूहामध्ये इन्फ्राप्लान इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि., सिग्मा इन्फ्राप्लान इंजिनिअरिंग प्रा. लि. तसेच इन्फ्राप्लान हायड्रॉलिक लॅबोरेटरी यांचा समावेश आहे. विद्यापीठातील भूगोल अधिविभाग आणि हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्रामध्ये जलविद्याविषयक संशोधन सुरू असून या संशोधनाला उद्योग क्षेत्राची जोड मिळण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वाचा ठरेल.

या सामंजस्य कराराअंतर्गत विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, औद्योगिक प्रशिक्षण, लाईव्ह इंडस्ट्री प्रोजेक्ट्स, संयुक्त संशोधन, कौशल्य विकास, नवोपक्रम, स्टार्टअप्स, पेटंट विकास तसेच विविध सरकारी संशोधन प्रकल्पांमध्ये सहकार्याची संधी मिळणार आहे. सामंजस्य करारावर कुलगुरू डॉ. राजनीश कामत व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि इन्फ्राप्लान समुहाचे संचालक आशिष अभय दोशी यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी विभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, संचालक डॉ. सागर डेळेकर, डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. गणेश न्हिवेकर, डॉ. सोमनाथ पवार आदी उपस्थित होते.

16 JUL 2026 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ. शेजारी डावीकडून डॉ. रणधीर शिंदे, व्ही. एन. शिंदे, डॉ. सरोज पाटील, नंदकुमार मोरे उपस्थित होते.

# डॉ. एन. डी. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व विचार-आचारांचा दुर्मीळ संगम

## किशोर बेडकीहाळ : जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील म्हणजे राजकारणातील नैतिकता आणि सामाजिक न्यायाचा ध्यास होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व विचार-आचारांचा दुर्मीळ संगम होते. त्यांच्या प्रत्येक चळवळीला, आंदोलनाला त्यांच्या उच्च नैतिकतेचे अधिष्ठान लाभलेले होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी आज येथे केले.

ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात 'डॉ. एन.डी. पाटील आणि सामाजिक चळवळी' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनातर्फे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तर डॉ. सरोज (माई) पाटील प्रमुख उपस्थित होत्या. बेडकीहाळ म्हणाले, 'राजकारणातील नैतिकता आणि नैतिकतेचे राजकारण यांचे अद्वैत डॉ. पाटील यांनी आयुष्यभर जपले.'

कुलसचिव डॉ. शिंदे यांनी, डॉ. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व हे सखोल अध्ययन, चिंतन आणि मूल्याधिष्ठित कृतीतून घडल्याचे सांगितले. तसेच डॉ. सरोज (माई) पाटील यांनी डॉ. पाटील यांच्या सहजीवनातील आठवणी पुस्तक स्वरूपात जतन करून पुढील पिढीसमोर आणाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली.

डॉ. पाटील यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकणारा पोवाडा शाहीर रंगराव पाटील आणि सहकाऱ्यांनी सादर केला. डॉ. अशोक चौसाळकर, टी. एस. पाटील, भारती पाटील, अवनीश पाटील, नंदकुमार मोरे, प्रभंजन माने, कृष्णा पाटील, अक्षय सरवदे, दिनकर झिंबरे, एम. बी. शेख, अभिषेक मिठारी उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

### वेदनांवर फुंकर घालणारी सुखद झुळक

**डॉ. एन. डी. पाटील यांना लोक वादळ समजत आणि या वादळासमवेत मी संसार केला, याबद्दल माझे कौतुक करतात. तथापि, एन. डी. सर हे वादळ नव्हते, तर समाजाच्या वेदनांवर हळूवार फुंकर घालणारी सुखद वाऱ्याची झुळुक होते. त्यांनी आयुष्यभर जोपासलेल्या उच्च नीतिमानतेचा आम्हा सर्वच कुटुंबीयांना नेहमीच अभिमान राहिला, असे डॉ. सरोज पाटील यांनी सांगितले.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2026
जनप्रवास




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना किशोर बेडकीहाळ. मंचावर (डावीकडून) डॉ. रणधीर शिंदे, डॉ. विलास शिंदे, डॉ. सरोज शिंदे व डॉ. नंदकुमार मोरे.**

# 'उच्च राजकीय-सामाजिक नैतिकतेचे दुसरे नाव म्हणजे डॉ. एन. डी. पाटील'

**जनप्रवास : कोल्हापूर**

डॉ. एन. डी. पाटील म्हणजे राजकारणातील नैतिकता आणि सामाजिक न्यायाचा ध्यास होते. त्यांच्या प्रत्येक चळवळीला, आंदोलनाला त्यांच्या उच्च नैतिकतेचे अधिष्ठान लाभलेले होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी येथे केले.

ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात 'डॉ. एन.डी. पाटील आणि सामाजिक चळवळी' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते, तर डॉ. सरोज (माई) पाटील प्रमुख उपस्थित होत्या. अध्यक्षीय समारोपात कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी डॉ. एन. डी. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व हे सखोल अध्ययन, चिंतन आणि मूल्याधिष्ठित कृतीतून घडल्याचे सांगितले. तसेच, डॉ. सरोज (माई) पाटील यांनी डॉ. एन. डी. पाटील यांच्या सहजीवनातील आठवणी पुस्तक स्वरूपात जतन करून पुढील पिढीसमोर आणाव्यात, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. टी.एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. अवनीश पाटील, प्रभंजन माने, डॉ. कृष्णा पाटील, अक्षय सरवदे, दिनकर झिंबरे, एम.बी. शेख, अभिषेक मिठारी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थीवर्ग होता.

**वेदनांवर फुंकर घालणारी सुखद वाऱ्याची झुळुक**

यावेळी डॉ. सरोज पाटील म्हणाल्या, एन.डी. पाटील यांना लोक वादळ समजत आणि या वादळासमवेत मी संसार केला, याबद्दल माझे कौतुक करतात. तथापि, एन.डी. सर हे वादळ नव्हेत, तर समाजाच्या वेदनांवर हळुवार फुंकर घालणारी सुखद वाऱ्याची झुळुक होते.

16 JUL 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नैतिकतेचे दुसरे नाव डॉ. एन. डी. पाटील : बेडकीहाळ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. एन. डी. पाटील म्हणजे राजकारणातील नैतिकता आणि सामाजिक न्यायाचा ध्यास होते. त्यांच्या प्रत्येक चळवळीला, आंदोलनाला त्यांच्या उच्च नैतिकतेचे अधिष्ठान लाभलेले होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी बुधवारी येथे केले.

ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात 'डॉ. एन. डी. पाटील आणि सामाजिक चळवळी' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. त्यांनी डॉ. पाटील यांच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक चळवळींचा सर्वांगीण आढावा घेतला. विद्यापीठाच्या डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते, तर डॉ. सरोज पाटील प्रमुख उपस्थित होत्या.



यावेळी बहुजन व शोषितकेंद्री राजकारण, श्रमिककेंद्री अर्थकारण आणि सामाजिक न्यायकेंद्री समाजकारण हा डॉ. पाटील यांच्या संपूर्ण राजकीय आणि सामाजिक चळवळीचा गाभा असल्याचे सांगून बेडकीहाळ म्हणाले, डॉ. एन. डी. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व विचार आणि आचार यांचा दुर्मीळ संगम होते. राजकारणातील नैतिकता आणि नैतिकतेचे राजकारण यांचे अद्वैत त्यांनी आयुष्यभर जपले. सार्वजनिक जीवनात वैयक्तिक स्वार्थाला कधीही स्थान न देता पारदर्शक, मूल्यनिष्ठ आणि संघर्षशील नेतृत्व त्यांनी उभे केले. शेतकरी, शेतमजूर, कामगार, धरणग्रस्त, वंचित आणि बहुजन समाजाच्या प्रश्नांना त्यांनी आयुष्यभर प्राधान्य दिले. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, दुष्काळग्रस्तांचे आंदोलन, शेतमालाला योग्य भाव, रोजगार हमी, नामांतर चळवळ, सामाजिक न्याय आणि शिक्षणाचा हक्क अशा विविध प्रश्नांवर त्यांनी सातत्याने संघर्ष उभारला.

अध्यक्षीय समारोपात कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी डॉ. एन. डी. पाटील यंचे व्यक्तिमत्त्व हे सखोल अध्ययन, चिंतन आणि मूल्याधिष्ठित कृतीतून घडल्याचे सांगितले. तर यावेळी डॉ. सरोज पाटील यांनीही डॉ. एन. डी. पाटील यांच्यासोबतच्या सहजीवनातील आठवणींना उजाळा दिला.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले, डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. अक्षय सरवदे, दिनकर झिंबरे, एम. बी. शेख, अभिषेक मिठारी आदी उपस्थित होते.

0 JUL 2026

महा न्यूज & व्ह्यूज

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob.-9175089609


# उच्च राजकीय-सामाजिक नैतिकतेचे दुसरे नाव म्हणजे डॉ. एन. डी. पाटील: किशोर बेडकीहाळ

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :**
डॉ. एन.डी. पाटील म्हणजे राजकारणातील नैतिकता आणि सामाजिक न्यायाचा ध्यास होते. त्यांच्या प्रत्येक चळवळीला, आंदोलनाला त्यांच्या उच्च नैतिकतेचे अधिष्ठान लाभलेले होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी आज येथे केले.

ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात 'डॉ. एन.डी. पाटील आणि सामाजिक चळवळी' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. बेडकीहाळ यांनी डॉ. पाटील यांच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक चळवळींचा सर्वांगीण आढावा घेतला. विद्यापीठाच्या डॉ. एन.डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते, तर डॉ. सरोज (माई) पाटील प्रमुख उपस्थित होत्या.

यावेळी बहुजन व शोषितकेंद्री राजकारण, श्रमिककेंद्री अर्थकारण आणि सामाजिक न्यायकेंद्री समाजकारण हा डॉ. पाटील यांच्या संपूर्ण राजकीय आणि सामाजिक चळवळीचा गाभा असल्याचे सांगून श्री. बेडकीहाळ म्हणाले, डॉ. एन. डी. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व विचार आणि आचार यांचा दुर्मीळ संगम होते. राजकारणातील नैतिकता आणि नैतिकतेचे राजकारण यांचे अद्वैत त्यांनी आयुष्यभर जपले. सार्वजनिक जीवनात वैयक्तिक स्वार्थाला कधीही स्थान न देता पारदर्शक, मूल्यनिष्ठ आणि संघर्षशील नेतृत्व त्यांनी उभे केले. शेतकरी, शेतमजूर, कामगार, धरणग्रस्त, वंचित आणि बहुजन समाजाच्या प्रश्नांना त्यांनी आयुष्यभर प्राधान्य दिले. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, दुष्काळग्रस्तांचे आंदोलन, शेतमालाला योग्य भाव, रोजगार हमी, नामांतर चळवळ, सामाजिक न्याय आणि शिक्षणाचा हक्क अशा विविध प्रश्नांवर त्यांनी सातत्याने संघर्ष उभारला.

डॉ. पाटील यांच्या आंदोलनांची वैशिष्ट्ये स्पष्ट करताना बेडकीहाळ यांनी सांगितले की,




प्रत्येक आंदोलनामागे सखोल अभ्यास, प्रश्नांची नैतिकता, योग्य वेळ आणि शांततामय संघर्षाची भूमिका असे चार महत्त्वाचे आधारस्तंभ असत. आंदोलन करतानाही संवादाचे दरवाजे कायम खुले ठेवण्याची त्यांची भूमिका होती. गांधीवादी अहिंसा आणि समाजवादी विचार यांचा प्रभाव त्यांच्या कार्यपद्धतीत स्पष्टपणे दिसून येत होता.

शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा उल्लेख करताना बेडकीहाळ म्हणाले, शिक्षण हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे, आर्थिक परिस्थिती त्यासाठी अडथळा ठरू नये, ही त्यांची ठाम भूमिका होती. ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव होऊ नये तसेच गुणवत्तापूर्ण आणि न्याय्य शिक्षणव्यवस्था उभी राहावी, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

अध्यक्षीय समारोपात कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी डॉ. एन. डी. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व हे सखोल अध्ययन, चिंतन आणि मूल्याधिष्ठित कृतीतून घडल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रश्नावर भूमिका घेण्यापूर्वी त्याचा सर्वांगीण अभ्यास करण्याची वृत्ती अंगीकारावी, हाच डॉ. पाटील यांच्या जीवनातून घेण्यासारखा मोठा संदेश असल्याचे त्यांनी नमूद केले. महापुरुषांचे अंधानुकरण न करता त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन स्वतः चे व्यक्तिमत्त्व अधिक सक्षम घडवावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच, डॉ. सरोज (माई) पाटील यांनी डॉ. एन. डी. पाटील यांच्या सहजीवनातील आठवणी पुस्तक स्वरूपात जतन करून पुढील पिढीसमोर आणाव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. सरोज पाटील यांनीही डॉ. एन.डी. पाटील यांच्यासोबतच्या आपल्या सहजीवनातील आठवणींना उजाळा दिला. एन.डी. पाटील यांना लोक वादळ समजत आणि या वादळासमवेत मी संसार केला, याबद्दल माझे कौतुक करतात. तथापि, एन.डी. सर हे वादळ नव्हेत, तर समाजाच्या वेदनांवर हळुवार फुंकर घालणारी सुखद वाऱ्याची झुळुक होते. त्यांनी आयुष्यभर जोपासलेल्या उच्च नीतिमानतेचा आम्हा सर्वच कुटुंबियांना नेहमीच अभिमान राहिला, असे त्यांनी सांगितले.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. टी.एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. अक्षय सरवदे, दिनकर झिंबरे, एम.बी. शेख, अभिषेक मिठारी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डॉ. एन.डी. पाटील यांच्यावर पोवाडा**

कार्यक्रमाच्या सुरवातीला डॉ. एन.डी. पाटील यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकणारा अतिशय स्फूर्तीदायक पोवाडा शाहीर रंगराव पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केला. त्यांच्या या सादरीकरणाने उपस्थितांची मोठी वाहवा मिळविली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2026
जनप्रवास




# शिवाजी विद्यापीठाला राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत तिसऱ्यांदा विजेतेपद

- संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित स्पर्धेत यश
- विद्यापीठाच्या संघाला विजेतेपदाचा चषक प्रदान

**जनप्रवास : कोल्हापूर**

भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित१७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सलग तिसऱ्यांदा गटस्तर विजेतेपदाची ट्रॉफी पटकावली आहे.यापूर्वी १४ व्या आणि १६ व्या स्पर्धेमध्ये विद्यापीठाने गटस्तरीय विजेतेपद प्राप्त केले होते.

राजधानी नवी दिल्ली येथे संसद भवन परीसरातील बालयोगी सभागृहात केंद्रीय संसदीय कार्य व कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या संघाला विजेतेपदाचा चषक प्रदान करण्यात आला.याबरोबरचशिवाजी विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांना "गुणवत्तापूर्ण बेस्ट प्रेझेंटर" पुरस्कारप्रदान करण्यात आला.यामध्येस्वप्निल माने,संदेश लडकट,नेहा शिंदे,तेजस सन्मुख,श्रेया म्हापसेकर,चंदनकुमार ओझा,श्रुती कुरणे, प्रतिभा बामणे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठ युवा संसद स्पर्धा समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनाही सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. संघासोबत डॉ.संतोष सुतार उपस्थित होते.

विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांनीही अभिनंदन केले आहे.डॉ.कविता वड्राळे, डॉ.सुखदेव उंदरे,आकाश ब्राह्मणे, अधिकारी आणि कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## सुसंस्कृत नेतृत्वाच्या जडणघडणीची प्रचिती : कुलगुरू

या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव,संसदीय प्रक्रिया आणि संवाद कौशल्यांचा विकास साधला जातो.राष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या या यशामुळे शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्तेची आणि सुसंस्कृत नेतृत्वाच्या जडणघडणीची पुनर्प्रचिती आली,अशा शब्दांत कुलगुरू डॉ.राजनीश कामत यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2026
तरूण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील मंगळवार दि.१४ रोजी ८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर ८४० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. मंगळवारी विविध ५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ६ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असुन परीक्षेसाठी १६४ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून मंगळवारी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद करण्यात आली नाही. परीक्षेत शिस्त राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2026

जनप्रवास

# ४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूरः शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. १ एप्रिलपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. बुधवारी १५ जुलैरोजी विविध ७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १० परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ९३८ विद्यार्थी उपस्थित होते. आज दि. १५ जुलैरोजी विविध ४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले असून आजअखेर ८४४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत.